# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** सन २०२३-२४ मध्ये नागपूर शहरातील वाहतुक नियंत्रक व ब्लिंकर
**{विद्युत विभाग}** यांचे देखभाल, सुस्थिती व दुरुस्ती च्या कामाचे रु. १,१९,४७,२४४/- चे प्राकलन तयार करण्यात आले आहे. या कामास प्रशासकीय मान्यता मिळण्यास्तव तसेच १५ दिवसाची ई-निविदा बोलवून हे काम करण्यास्तव मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :- 1) सदर कामाचा खर्च पद क्र.A22501730819 (373 जुने) अंतर्गत करावयाचा आहे.
2) सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 514/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 29/08/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (विद्युत), विद्युत विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार सन २०२३-२४ मध्ये नागपूर शहरातील वाहतुक नियंत्रक व ब्लिंकर यांचे देखभाल, सुस्थिती व दुरुस्ती च्या कामाचे रु. १,१९,४७,२४४/- चे प्राकलन तयार करण्यात आले आहे. या कामास प्रशासकीय मान्यता मिळण्यास्तव तसेच १५ दिवसाची ई- निविदा बोलवून हे काम करण्यास्तव मंजुरी प्रदान करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**